# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट १३६-२३** **दिनांक :- ०२/०५/२०२३**

## १४ वर्षापासुन पाहिजे असलेला खुनाच्या गुन्हयातील मुख्य आरोपीस अटक. माणिकपुर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

दिनांक १५/०९/२०१० रोजी ०९.४५ वा.चे पुर्वी कोणीतरी अज्ञात आरोपीने अज्ञात कारणावरुन अनोळखी इसमाचा गळा आवळुन खुन करुन त्यांचे दोन्ही हात बांधुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने प्रेत टाकुन दिले म्हणुन फिर्यादी नामे सुनिल सोपान पालवे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३४४/२०१० कलम ३०२, २०१, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान मयत इसमाचे नाव पांधारी शामु राजभर, वय २५ वर्षे, रा. ताई पाटील चाळ, खैरपाडा, वालीव, वसई पुर्व, जि. पालघर असल्याचे निष्पन्न झाले होते.

वरिष्ठांनी पोलीस ठाणेस दाखल गुन्हयातील अभिलेखावरील पाहिजे व फरारी आरोपी यांची विशेष शोध मोहीम राबवुन त्यांच्या ठावठिकाणांबाबत माहिती घेवून त्यांना गुन्हयात अटक करण्याबाबत सुचना व मार्गदर्शन केले होते.

सदर सूचना व मार्गदर्शनांप्रमाणे माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे व गुप्त बातमीदारांकडुन प्राप्त माहीतीचे आधारे माणिकपूर पोलीस ठाणे अभिलेखावरील वर नमूद गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे संजय गामा भारव्दाज, वय ३९ वर्षे, धंदा नोकरी, रा. रुम नं. ए/१०५, प्राजक्ता बिल्डिंग, बावनपुरी गाव, जे.बी. नगर, चकाला, अंधेरी पुर्व, मुंबई यास साकीनाका, मुंबई येथुन ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक तपास केला असता मयत इसमाने सदर आरोपीस रु.५०००/- ॲडव्हांस न दिल्याचा राग आल्याने सदर आरोपीने त्याच्या साथीदारांसह मयत इसमास कारमध्ये बसवुन रुमालाने त्याचा गळा आवळुन खुन केला व त्याच रुमालाने मयताचे हात पाठीमागे बांधुन त्यास मौजे ससुनवघर गावचे हद्दीत, बकरी मंडीचे विरुध्द बाजुस, मुंबई अहमदाबाद महामार्गावर, मुंबई वाहीनीचे लगत मातीच्या ढिगा-याजवळ फेकुन दिल्याचे व तो मागील १४ वर्षापासुन बनारस, उत्तरप्रदेश व अंधेरी, मुंबई येथे आपले अस्तित्व लपवुन राहत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.नि. अभिजीत मडके (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटिल, धनंजय चौधरी, शामेश चंदनशिवे, अनिल चव्हाण व पो.शि. प्रविण कांदे यांनी केली आहे.

---ooo---